होर्डिंग व बॅनर डिजीटल पध्दतीने फ्लेक्सद्वारे लावणे व हाताने रंगविण्याकरिताचे दर.

महाराष्ट्र शासन

सामान्य प्रशासन विभाग

शासन निर्णय क्रमांक : मावज-२०१६/प्र.क्र.१९९/३४

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दिनांक :- ३१ मार्च, २०१८.

<u>वाचा</u> : - १) वित्त विभाग, शासन परिपत्रक्र क्र. जीएसटी-१०१७/प्र.क्र.१५५/कराधान-१, दि.११.०९.२०१७.

२) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक :-मावज-२०१६/प्र.क्र.१९९/३४, दि. १४.०७.२०१६

३) माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे पत्र क्र.प्रदर्शने-२०१७/GSTकर/का-६/४७१, दि.६.१२.२०१७

४) माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे पत्र क्र.प्रदर्शने-२०१७/GSTकर/का-६/६९३, दि.३१/०३/२०१८

<u>प्रस्तावना</u> :-

उपरोल्लिखत शासन निर्णय संदर्भ क्र.१ अन्वये माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या होर्डिंग व बॅनर डिजिटल पध्दतीने फ्लेक्सदवारे लावणे व हाताने रंगविण्याकरिता संस्था निश्चित करण्यास मंजुरी देण्यात आली आहे व संदर्भ क्र.१ अन्वये जीएसटी अंमलबजावणी संदर्भात वित्त विभागाने दिलेल्या सूचनानुसार निश्चित केलेल्या दरामध्ये सुधारणा करणे आवश्यक होते. सदर शासन निर्णयात सुधारणा करण्याची बाब विचाराधीन होती. त्यानुसार संदर्भांकित शासन निर्णयामध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

<u>शासन निर्णय</u> :-

संदर्भाधिन शासन निर्णय क्र.मावज-२०१६/प्र.क्र.१९९/३४, दि.१४ जुलै,२०१६ अन्वये बॅनर डिजीटल पध्दतीने तसेच स्क्रिन प्रिंटींगद्वारे तयार करुन लावणे व अपेक्षित कालावधीनुसार काढणे या कामांचा एकत्रित दर निश्चित करण्यात आला आहे. जीएसटी अंमलबजावणी संदर्भात वित्त विभागाने निर्गमित केलेल्या आदेशांचा विचार करुन सदर संस्थेच्या कंत्राटीचा कालावधी ८ जुलै, २०१६ ते ३१ मे २०१८ असा आहे. त्यामुळे सदर प्रकरणी दर निश्चित करताना जीएसटी पूर्व व जीएसटी नंतरचा भार लक्षात घेवून जीएसटी अंमलबजावणी नंतरच्या कालावधीसाठी कल्याणी कॉर्पोरेशन, पुणे या संस्थेच्या दरामध्ये खालीलप्रमाणे बदल करण्यात येत आहे-

क्र.	तपशिल (डिजिटल बॅनर)	दर करातील प्रती चौ.फूट	६% व्हॅट वजा जाता निव्वळ दर प्रती चौ.फुट	१८% जीएसटीसह सुधारित दर प्रती चौ.फुट
१	प्लेक्स बॅनरचा दर	रु. ९.८१	रु.९.२५	रु.१०.९२
२	डिजिटल बॅनरचा दर	रु.७.११	रु.६.७१	रु.७.९२
३	कापडी बॅनर	रु.१४.३१	रु.१३.५०	रु.१५.९३
४	कापडी बॅनर (१० पेक्षा जास्त)	रु.७.२०	रु.६.७९	रु.८.०१
५	सॅटीन बॅनर	रु.४५.४५	रु.४२.८८	रु.५०.६०
६	सॅटीन बॅनर (१० पेक्षा जास्त)	रु.२६.१०	रु.२४.६२	रु.२९.०५

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१८०४०२११२१५५५९०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Ramkisan Narayanrao Musale

Digitally signed by Ramkisan Narayanrao Musale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e28f6332f6edfebdfb055bf154f99ec0b0d9e613209e20e7a215f026da6875ae, cn=Ramkisan Narayanrao Musale
Date: 2018.04.02 11:23:34 +05'30'

(रा.ना.मुसळे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,मुंबई-४०० ०३२.
२. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, १/२/,मुंबई/नागपूर
३. महालेखापाल (लेखापरिक्षा), महाराष्ट्र १/२/, मुंबई नागपूर.
४. संचालक, (माहिती) (प्रशासन), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई
५. अधिदान व लेखा अधिकारी,मुंबई
६. निवासी लेखापरिक्षा अधिकारी,मुंबई
७. उपसंचालक (लेखा), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय,मुंबई-३२
८. संबंधित संस्था (माहिती जनसंपर्क महासंचालनालयामार्फत)
९. निवड नस्ती/कार्या-३४.